लोकपत्र 17/04/2023

# चोरीच्या नऊ मोटारसायकली जप्त, चार आरोपी अटक

लोकपत्र 17/04/2023

## ग्रामीण पोलिसांची कारवाई



नांदेड, प्रतिनिधी

शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणाहून मोटारसायकल चोरणाऱ्या चार जणांना पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून नऊ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. सदरील कारवाई दि. १६ एप्रिल रोजी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली.

नांदेड जिल्ह्यामध्ये दररोज मोटारसायकल चोरीच्या घटना पोलीस दप्तरी नोंद होत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दुचाकी चोरी प्रकरणातील आरोपीस अटक करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक यांना दिले आहेत. त्या अनुषंगाने ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने दुचाकी चोरासंदर्भात गोपनीय माहिती काढली. ठाण्याच्या हद्दीत ज्या-ज्या ठिकाणी दुचाकी चोरून नेण्यात आल्या. त्या परिसरातील सीसीटीव्हींची बारकाईने पाहणी करण्यात आली. गुन्हे शोध पथकाचे पोउपनि आनंद बिच्चेवार, पोहेकॉ प्रभाकर मलदोडे, विक्रम वाकडे, प्रमोद कराळे, संतोष जाधव, विश्वनाथ पवार, चंद्रकांत स्वामी, संतोष बेलूरोड यांनी सीसीटीव्ही फुटेज सायबर सेलच्या मदतीने हदगाव परिसरात धाड टाकून आरोपी माळसाकांत उर्फ गगन मारोती उराडे रा. कोटतीर्थ, अभिषेक विश्वंभर नागठाणे रा. तामसा, केशव व्यंकटराव शेंबेटवाड रा. खरटवाडी, कृष्णा शिवाजी जिनेवाड रा. वारंगा फाटा या चौघांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली.

सुरूवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु पोलिसांनी खाक्या दाखवताच चारही आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरी केलेल्या तब्बल नऊ दुचाकी त्यांच्याकडे मिळून आल्या. नांदेड, ग्रामीण, भाग्यनगर, अर्धापूर, मनाठा, लातूर एमआयडीसी दत्तवाडी, पुणे शहर या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरट्यांनी दुचाक्या चोरून आणल्या आहेत. चारही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडून अजूनही उघड होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. दरम्यान या कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिध्देश्वर भोरे यांनी नांदेड ग्रामीणचे अशोक घोरबांड, गुन्हे शोध पथकाचे आनंद बिच्चेवार यांच्यासह त्यांच्या पथकाचे विशेष कौतुक केले आहे.

गोदातीर 17/04/2023

# धारदार हत्यार बाळगणाऱ्या तिघांना अटक

17/04/2023 गोदातीर

## दोन खंजर आणि एक गुप्ती जप्त



**नांदेड-** भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून पोलिसांनी एक खंजर, एक गुप्ती तर नांदेड ग्रामीण पोलिसांनी एक खंजर जप्त केला आहे. या तिन्ही आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जंगमवाडी लायन्स हॉस्पीटलसमोर प्रदीप पाईकराव या पोलीस कर्मचाऱ्याने प्रभातनगर येथील दीपक विठ्ठल नरवाडे (वय ३२) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक खंजर जप्त करून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

तर दुसऱ्या घटनेत पोलीस हवालदार संजय जाधव यांनी ओंकार चंद्रकांत सूर्यवंशी (वय १९) रा. कल्याणनगर याला अटक करून त्याच्याकडून गुप्ती जप्त केली. त्याच्याविरुद्धही भाग्यनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील दोन्ही प्रकरणात तपास बालाजी चन्ने आणि सय्यद हे करत आहेत.

यासोबतच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत हडको बसस्टॉपसमोर पोलीस हवालदार मोहन झुंजारे यांनी निखील मधुकर कांबळे रा. वाघाळा याला अटक करून त्याच्याकडून खंजर जप्त केली. मोहन झुंजारे यांच्या फिर्यादीवरून निखील कांबळे विरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.